RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com · Vidabh Kesari News · 90969 45629 · @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैंनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

जनतेच्या मनात राज करणारे विदर्भातील एकमेव दैनिक

अमरावती

३० मंगळवार डिसेंबर २०२५

✻ वर्ष ५ ✻ अंक २१४

✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

### बँकेत जबरी चोरी

▸विदर्भ केसरी। नागभीड,

तालुक्यातील मोहाळी मोकासा येथील ग्रामीण बँकेवर दरोडा टाकण्यात आला. यात 170 ग्रॅम सोने आणि 3 लाख 66 हजार रुपये लंपास करण्यात आले आहेत. सोमवारी बँक उघडल्यानंतर ही घटना उघडकीस आली. हा दरोडा शुक्रवार ते रविवार दरम्यान रात्री टाकण्यात आला असावा, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. chandrapur-bank-robbery बँकेचे शिपाई प्रभाकर शेंद्रे सोमवारी रजेवर असल्याने सहायक प्रबंधक करिष्मा धकाते यांनी बँकेचा दरवाजा उघडला आणि त्या आत गेल्या. स्ट्राँगरूमजवळ गेल्या असता त्यांना स्ट्राँगरूमची तोडफोड झाल्याचे दिसून आले. त्यांनी लगेच बाहेर येऊन रजेवर असलेल्या शिपायास बोलावून घेतले. शाखा प्रबंधक शेख मोहसीन शेख यांनाही माहिती दिली. शाखा प्रबंधक शेख तातडीने बँकेत पोहचले. परिस्थितीचे अवलोकन करून त्यांनी पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनीही तातडीने घटनास्थळ गाठून पंचनामा सुरू केला. लगेच न्यायवैद्यक चमूलाही पाचारण करण्यात आले. ही चमू घटनास्थळी पोहोचताच तपासाला गती आली. लवकरच डॉगस्कॉड पोहचत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, बँकेचे प्रबंधक शेख मोहसीन शेख मुस्तफा अगवान यांनी दिलेल्या माहितीनुसार, बँकेच्या लॉकरमध्ये असलेले 170 ग्रॅम सोने आणि 3 लाख 66 हजार रुपये बँकेतून चोरी गेले आहेत.

### शेतातील झाडावर अस्वलीचे बस्तान

▸विदर्भ केसरी। पोंभूर्णा,

तालुक्यातील देवई येथील एका शेतात झाडावर अस्वलीने बस्तान मांडल्याची घटना शनिवारी उघडकीस आली. या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. रविवारी सकाळच्या सुमारास त्या अस्वलीला हूसकावून लावण्यात वनविभागाला यश आले. पोंभुर्णा तालुक्यातील देवई येथील रामचंद्र इष्टाम यांच्या सर्व्हे क्रमांक 256 मधील 1 हेक्टर शेतात कापूस व तुरीची लागवड करण्यात आली आहे. pombhurna-bear-farmer मात्र, शेतातील आंजनाच्या झाडावर शनिवारी अस्वलीने बस्तान मांडले. कापूस तोडणीसाठी शेतात गेलेल्या मजुरांना अस्वल दिसताच त्यांनी तत्काळ माघार घेतली. ही बाब लक्षात येताच शेतकऱ्याने गावकरी व वनविभागाला सूचना केली.

### खो-खो स्पर्धेचा समारोप

▸विदर्भ केसरी। वर्धा,

सहयोग शिक्षण प्रसारक मंडळ वर्धाद्वारा "प्रदीप की याद में" विदर्भ राज्य स्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन स्थानिक जुने आरटीओ मैदान प्रतापनगर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत विदर्भातील महिला व पुरुषांची ३५ संघ सहभागी झाले होते. त्यात पुरुष गटात विदर्भ क्रीडा मंडळ काटोल तर महिलांत नवजयहिंद क्रीडा मंडळ यवतमाळ यांनी प्रथम पारितोषिक पटकावले. मंडळाचे माजी राष्ट्रीय खो-खो पटू दिवंगत प्रदीप महाजन यांच्या स्मृतीनिमित्त घेण्यात आलेल्या

## जंजाळांच्या डोळ्यात अश्रू, शिरसाटांच्या घराबाहेर कार्यकर्ते जमा

# 'हायव्होल्टेज' ड्रामा

▸विदर्भ केसरी। छत्रपती संभाजीनगर:

**महानगरपालिका निवडणुकीच्या जागावाटपावरून महायुतीमध्ये सुरू असलेला पेच आता टोकाच्या वळणावर पोहोचला आहे. भाजपच्या पाचव्या प्रस्तावात शिंदेसेनेच्या वाट्यातील ७ महत्त्वाच्या जागा भाजपला देण्यात आल्याची माहिती समोर येताच, जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांना अश्रू अनावर झाले.**



अश्रू आणि आक्रोष जागावाटपाच्या नऊ बैठका होऊनही तोडगा निघत नसल्याने दोन्ही पक्षांत तणाव होता. मात्र, ताज्या प्रस्तावात जंजाळ समर्थकांचे वर्चस्व असलेले ७ प्रभाग भाजपला सोडण्यात आले.

"कार्यकर्त्यांवर अन्याय होत असेल तर मी निवडणूक लढणार नाही," अशी घोषणा करत जंजाळ यांनी कार्यालयातून बाहेर पडणे पसंत केले. या प्रकारामुळे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत कार्यकर्त्यांनी त्यांच्या घराकडे कूच केली आहे. ज्या प्रभागांनी विधानसभेत पक्षाला मताधिक्य दिले, तेच प्रभाग का सोडले? असा सवाल करत जंजाळ यांनी नाराजी व्यक्त केली. कार्यालयाबाहेर पडताना जंजाळांच्या डोळ्यातील पाणी पाहून कार्यकर्ते आक्रमक झाले आणि त्यांनी थेट "युती तोडा, स्वबळावर लढा" अशा घोषणा द्यायला सुरुवात केली.

### शिरसाटांच्या घरासमोर कार्यकर्ते जमले

■ उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उद्याची शेवटची तारीख आहे. अशा परिस्थितीत जंजाळ आपल्या समर्थकांसह शिरसाटांच्या घराकडे रवाना झाले आहेत. पालकमंत्री शिरसाट यांनी यापूर्वी भाजपला ४१ जागांचा अल्टिमेटम दिला होता, तर मंत्री अतुल सावे यांनीही शेवटचा प्रस्ताव देत प्रतिइशारा दिला होता. आता बाहेरच्या शत्रूशी लढण्यापूर्वी शिरसाटांना स्वतःच्या घरातील (पक्षातील) नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान पेलावे लागणार आहे.

### सर्व मिळून निर्णय घेऊ

■ दरम्यान, पालकमंत्री शिरसाट यांनी घराबाहेर येत संतप्त कार्यकर्ते आणि जिल्हाध्यक्ष जंजाळ यांच्यासोबत चर्चा केली. भाजपचा प्रस्ताव आला आहे. सर्वांना बोलून निर्णय घेणार आहे. मात्र, आपल्यात गैरसमज करून घेऊ नका, शिवसैनिक लढतो. कोणावरही अन्याय होणार नाही, तुम्ही चिंता करू नका, अशी ग्वाही शिरसाट यांनी यावेळी दिली.

## १२८ उड्डाणे रद्द, ८ विमानांचे मार्ग बदलले





▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली, :

सोमवारी दाट धुके आणि कमी दृश्यमानतेमुळे दिल्ली विमानतळावर १२८ विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली, तर ८ विमानांचे मार्ग बदलण्यात आले आणि जवळपास २०० विमानांना विलंब झाला. रद्द झालेल्या उड्डाणांमध्ये ६४ निर्गमन आणि ६४ आगमन करणारी विमाने रद्द करण्यात आली.

इंडिगोने प्रवाशांना विमानतळावर जाण्यापूर्वी त्यांच्या विमानाची स्थिती तपासण्याचा सल्ला दिला. दिल्ली आणि उत्तर भारतातील अनेक विमानतळांवर धुक्याची स्थिती कायम आहे. दृश्यमानता कमी झाली आहे आणि परिणामी, सध्या विमानांची वाहतूक सामान्यपेक्षा मंद आहे, ज्यामुळे विलंब होत आहे, असे इंडिगोने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटेल.

## भाजपमध्ये घराणेशाहीला चाप

▸विदर्भ केसरी।पुणे : प्रतिनिधी




महापालिका निवडणुकीत आमदार, खासदार किंवा आजी-माजी नगरसेवक यांच्या नातलगांना उमेदवारी देऊ नये, अशा प्रकारचा आदेश भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने दिला आहे. त्यामुळे पुण्यात इच्छुक असलेल्या आमदार किंवा नगरसेवक यांच्या नातेसंबंधातील दावेदारांची पंचायत होणार आहे.

काँग्रेसच्या घराणेशाहीवर भारतीय जनता पक्षाने सातत्याने टीका केली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षामध्ये सुद्धा गेल्या काही वर्षांमध्ये ग्रामपंचायत स्तरापासून आमदारकीपर्यंत नात्यागोत्यातील राजकारणाला महत्त्व आले होते. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकांचे अर्ज भरण्यासाठी सुरुवात झालेली असताना दिल्लीमधून नात्यागोत्यातल्या उमेदवारांना, इच्छूकांना वगळा अशा प्रकारचा आदेश आल्याचे विश्वसनीय सूत्रांनी रविवारी सांगितले. त्यामुळे संबंधित इच्छुकांची पंचाईत होणार आहे. भाजपने निष्ठावान कार्यकर्ते, पदाधिकारी असतानाही अनेक प्रभागांमध्ये इतर पक्षातील माजी नगरसेवक, पदाधिकारी यांना पक्षात प्रवेश देऊन उमेदवारी देण्याचा शब्द दिला आहे. भाजपने निश्चत केलेल्या पहिल्या यादीत बाहेरच्या पक्षातून आलेल्या पदाधिका-याचे नाव आल्यास भाजपचे पदाधिकारी नाराज होऊ शकतात. तसेच, गेल्या निवडणुकीत नगरसेवक राहिलेल्या काही उमेदवारांचा पत्तादेखील या निवडणुकीत कट होण्याची शक्यता आहे. शहर भाजपमध्ये वरिष्ठ पदाधिकारी म्हणून जबाबदारी संभाळणारे, आमदार, खासदार यांच्या कुटुंबातील व्यक्ती उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांनी पक्षाच्या मुलाखतीदेखील दिलेल्या आहेत. कोअर कमिटीच्या बैठकीत त्यांच्या नावांना प्राधान्य देण्याची शिफारसदेखील करण्यात आली आहे. त्याबाबत वरिष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त करून कार्यकर्त्यांना संधी द्या, अशी सूचना केल्याने सुधारीत यादी भाजपकडून करण्यात येत आहे. ही यादी प्रदेश भाजपकडे पाठविण्यात येणार असून, त्याला मान्यता मिळाल्यानंतरच ती जाहीर केली जाणार आहे. गेल्या काही काळापासून प्रभाग पद्धतीमध्ये महिला आरक्षण झाल्याने अनेकांनी राजकारणाशी कोणताही संबंध नसलेल्या आपल्या बहिणीला, पत्नीला, आईला किंवा सुनेला, मुलीला उभे करून महापालिकेवर अप्रत्यक्षपणे सत्ता मिळवली होती. भारतीय जनता पक्षामध्ये सुद्धा नात्यागोत्याच्या राजकारणाला बहर आला होता. अशा काळात केंद्रीय नेतृत्वाने नव्या चेह-यांना संधी देण्यासाठी स्थानिक पातळीवर घराणेशाही संपवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे स्वागत कार्यकर्ते करीत आहेत

## ट्रॅक्टर नदीत कोसळला, शेतकऱ्याचा मृत्यू

▸विदर्भ केसरी। अचलपूर,



शेतीत दिवसभर कष्ट करून घरी परतणाऱ्या एका शेतकऱ्यावर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना अचलपूर तालुक्यातील कारणबाग शेत शिवारात घडली. प्रमोद शिवहरी मेहरे उर्फ बाबू (वय ४० वर्षे, रा. नौबागपुरा, अचलपूर) यांचा ट्रॅक्टर अपघातात जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत ट्रॅक्टरवर बसलेला गुलाब नामक मजूर गंभीर जखमी झाला आहे. प्रमोद मेहरे यांनी गिरीश खंडेलवाल (रा. च्यावलमंडी) यांच्या कारणबाग शेत शिवारातील शेती लागवडीचे काम घेतले होते.

सोमवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास शेतातील कापूस वेचून कापसाचे गाठोडे ट्रॅक्टरवर घेऊन ते घरी परतत होते. मात्र, सापण नदी पात्राजवळून जात असताना नदीकाठचा कठडा अचानक खचला आणि ट्रॅक्टर थेट नदीत कोसळला. या भीषण अपघातात ट्रॅक्टरखाली दबल्या गेल्याने प्रमोद मेहरे यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत ट्रॅक्टरवर बसलेला गुलाब हा मजूर गंभीर जखमी झाला. त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. प्रमोद मेहरे हे कष्टकरी, मनमिळावू व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या अकाली मृत्यूने नौबागपुरा परिसरात शोककळा पसरली असून, कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शेतीकामासाठी रोज जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला

## कोंबडा झुंजीच्या जुगारावर पोलिसांचा छापा

▸विदर्भ केसरी। चंद्रपूर :

चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यात अवैध कोंबडा झुंजीच्या माध्यमातून जुगार खेळणाऱ्या तीन जणांवर कोरपना पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या या छाप्यात ७ दुचाकींसह एकूण ३,९०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

दिनांक २८ डिसेंबर, २०२५ रोजी पोलीस स्टेशन कोरपना हद्दीतील मौजा शिवापूर येथील शेतशिवार परिसरात काही इसम कोंबड्यांच्या पायाला कात्या (ब्लेडसारखी धारदार हत्यारे) बांधून त्यांची झुंज लावून जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खात्री होताच कोरपना पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी छापा टाकला.

या छाप्यात जुगार खेळताना रंगेहाथ पकडण्यात आलेल्या आरोपी नामे गजु आत्राम, दौलत पिंपळशेंडे आणि देवराव कोडापे यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली. त्यांच्याकडून नगदी रोख रक्कम, ०३ जिवंत कोंबडे, ०३ कात्या (धारदार ब्लेड), तसेच झुंजीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले. शिवाय घटनास्थळावरून आणि काही पसार झालेल्या आरोपींच्या मालकीच्या ०७ मोटारसायकली देखील जप्त करण्यात आल्या. जप्त करण्यात आलेल्या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत ३,९०,००० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अवैध जुगार, प्राणी क्रौर्य आणि सार्वजनिक सुव्यवस्था भंग यासारख्या गंभीर बाबींअंतर्गत पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. काही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असून, त्यांचा शोध सुरू असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## 'बेस्ट' बसनं प्रवाशांना चिरडलं; ४ जण ठार

▸विदर्भ केसरी।

मुंबईतील भांडुप पश्चिम परिसरात सोमवारी रात्री बेस्ट बसचा थरार पाहायला मिळाला. स्टेशन रोड परिसरात बस रिव्हर्स घेत असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने बसने प्रवाशांना जोरदार धडक दिली.


या भीषण अपघातात चार जण ठार झाले. तर, नऊ जण जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

दरम्यान, सोमवारी रात्री सुमारे १०.०५ वाजताच्या सुमारास भांडुप स्टेशन रोड परिसरात ही घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, स्थानिक पोलीस, बेस्टचे वरिष्ठ कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित बेस्ट चालकाला ताब्यात घेतले असून पुढील कारवाईला सुरुवात केली आहे. मृतांमध्ये तीन महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. तर, जखमींमध्ये एकं महिला आणि ८ पुरुषांचा समावेश आहे




## सुपरमून' आणि 'उल्कावर्षाव'ने होईल नववर्षाचे स्वागत !

▸विदर्भ केसरी। नागपूर :



अवकाशात घडणाऱ्या नयमरम्य घटनांचे दर्शन येत्या नववर्षातही घेता येणार आहे. विशेष म्हणजे नववर्षारंभीच हा नजारा बघायला मिळणार आहे. येत्या ३ जानेवारीला चंद्र आणि सूर्य पृथ्वीच्या जवळ येत आहेत. त्यामुळे चंद्र अधिक प्रकाशित असेल, म्हणजे सुपरमून असेल. ३ व ४ जानेवारीला उल्कावर्षावही अनुभवता येणार आहे.

ग्रह-ताऱ्यांच्या मैत्री व परस्पर संबंधातून घडणाऱ्या विविध प्रकारच्या खगोलीय घटनांचा आनंद घेत यंदा आकाशप्रेमींनी नववर्षाचे स्वागत करा, असे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे. ३ जानेवारीला चंद्र आणि सूर्य पृथ्वीच्या जवळ आल्याने चंद्र अधिक प्रकाशित असल्याने सुपरमून असेल. असाच नजारा २४ नोव्हेंबर व २४ डिसेंबर रोजी बघता येईल. यावेळी पृथ्वीपासून चंद्राचे अंतर अतिशय कमी असेल. तसेच सूर्य सुध्दा येत्या ३ जानेवारीला पृथ्वी जवळ येईल, परंतु सध्या सूर्य दक्षिण गोलार्धात झुकलेला असल्याने तिकडे कडक उन्हाळा तर उत्तर गोलार्धात हिवाळा आहे.

यावर्षी आकाशात अनेक घटनांची रेलचेल असुन त्यात ग्रहणे, उल्का वर्षाव, ग्रहांची युती-प्रतियुती, इंटरनॅशनल स्पेस स्टेशन, स्टार लिंक्स, ग्रह दर्शन, उदयास्त, अचानक दाखल होणारे धुमकेतू अशा अनेक आकर्षक घडामोडी बघता येतील. नववर्षात सूर्य, चंद्र व प्रत्येकी दोन अशी चार ग्रहणे असुन आपल्या वाट्याला मात्र फक्त एक ३ मार्चचे चंद्रग्रहण असेल. सध्या स्थितीत संध्याकाळी पूर्व क्षितिजावर आकाशातील नवलाई दिसून येत असून सोबत सूर्यमालेतील सर्वात मोठा असलेला गुरू ग्रह रात्रभर असल्याने आपल्या आनंदात विशेष भर पडेल. पूर्वेच्या अपूर्व नजाऱ्यात बहू परिचित मृगनक्षत्र, जरा डाव्या बाजूस मिथुन राशी व अधिक प्रकाशित दिसणारा गुरु ग्रह दिसेल.

### उल्का वर्षाव आणि महत्वपूर्ण दिवस

■ पृथ्वी कक्षा आणि धुमकेतू वा लघुग्रह यांच्यातील वस्तूकण जेंव्हा पृथ्वी गुरुत्वाकर्षणामुळे खेचल्या गेल्याने उल्का वर्षाव अनुभवता येतो. वर्षारंभी ३ व ४ जानेवारी, २३ एप्रिल, ५मे,२८ जुलै, १३ ऑगष्ट, २१ ऑक्टोबर, ६ व १२ नोव्हेंबर आणि १४ व २३ डिसेंबर या दिवशी तारे तूटतांना दिसतील.

### ग्रह दर्शन आणि उदयास्त


■ सध्या पूर्व आकाशातील गुरु ग्रह एक जुन रोजी कर्क राशीत व नंतर १७ जूलैला अस्त आणि मग १० ऑगस्टला पूर्वोदयानंतर ३१ ऑक्टोबरला सिंह राशीत प्रवेश.

■ सर्वात तेजस्वी शूक्र ग्रहाचा अस्त असून १ फेब्रुवारीला पश्चिमेस १९ ऑक्टोबर पर्यंत व नंतर दिवाळी आधी दर्शनार्थ सज्ज होईल.

■ सूर्याच्या जवळ असलेला बुध ग्रह कधी सूर्योदयापूर्वी पूर्वेस किंवा सूर्यास्तानंतर पश्चिम आकाशात पाहता येईल. लालसर रंगांचा मंगळ ग्रह या वर्षात अधिक वेळ सूर्य सान्निध्यात राहिल्याने कमी दर्शन देईल.

## धनुष्यबाणाचे बटन दाबणा-यांना स्वर्गातच जागा : शहाजीबापू पाटील

▸विदर्भ केसरी।सोलापूर :



शिवसेना शिंदे गटाचे नेते शहाजीबापू पाटलांनी अजब वक्तव्य केले आहे. शिवसेनेला मतदान करणारे स्वर्गात जाणार असल्याचे विधान त्यांनी केले आहे. ज्यांनी धनुष्यबाणाचे बटन दाबले त्याला स्वर्गातच जागा आहे, तो नरकात जाणारच नाही अस विधान करत शहाजीबापू पाटलांनी अकलेचे तारे तोडले आहेत.

सांगोल्याच्या सभेत बोलताना बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, मी खात्रीने सांगतो, ज्यांनी ज्यांनी धनुष्यबाण दाबला त्यांना त्यांना स्वर्गातच जागा आहे. नरकात तुम्हाला देव घेत नाही. स्वर्गात तुम्ही गेल्याशिवाय राहत नाही. देव तुम्हाला नरकात जाऊच देत नसतो. मात्र, ज्यांनी विरोधकांची बटणं दाबली त्यांचे काय खरे नाही त्यांच्यात रामच उरला नाही, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. तसेच यावेळी बोलताना शहाजीबापू पाटलांनी विधानसभेतल्या पराभवावरून देखील दीपक साळुंखेंवर टीका केली. ते म्हणाले, मी भाकरीत साप पाळला होता म्हणूनच मला विधानसभेला पराभवाचा फटका बसला, असे ते म्हणाले. तसेच आपण आजही महायुतीत आहे. आपल्याला युतीचेच काम करायचे असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पुढे शहाजीबापू पाटील म्हणाले, हा मतदारसंघ २०१४ पासून शिवसेनेचा आहे. तुम्ही आमचा सन्मान ठेवा आम्ही तुमचा कोणताही शब्द खाली पडू देणार नाही. पण तुम्ही तसे केले नाही, तर आम्ही पुन्हा एकट्या वाटेने जाऊ, असा इशारा त्यांनी यावेळी भाजपला दिला. शिवाय तुम्ही आताच्या निवडणुकीत ऐकले असते तर तुम्ही सत्तेत निम्मे भागीदार झाला असता, असा टोलाही त्यांनी लगावला.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू


## अग्रलेख

# संदेश

*नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या. यामध्ये भाजपला भरघोस यश मिळाले. विरोधकांचे मनसुबे हाणून पाडत भाजप क्रमांक एकचा पक्ष बनला आहे. हे यश निर्विवादपणे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मिळालेले आहे. यशासारखे दुसरे काहीच नाही, असे म्हटले जाते. परंतु ज्यांना दीर्घ काळाचे राजकारण करायचे आहे, त्यांनी सत्ता, निवडणूक, पक्ष कार्यकर्ता आणि जनता या सर्वच बाबींचा विचार करण्याची आवश्यकता असते. खेड्यापाड्यातील गटातटाचे राजकारण हे बरेचदा जातिपातीचे असते. वर्षांपासून एकमेकांच्या सोबत राहणारा समाज हा अशा निवडणुकांच्या माध्यमातून जातिपातींमध्ये विभागला जातो. समाजाला एक करण्याचे प्रयत्न समाजामध्ये काही संघटना करताना दिसतात. परंतु सध्याचे राजकारण मात्र हे समाजाला विभाजित करतानाच दिसते. अनेकानेक वर्षे जे कार्यकर्ते सोबत काम करतात, बरेचदा त्यांना एकमेकांची जात माहीत नसते. परंतु निवडणुकीच्या निमित्ताने ती माहिती होते. राजकीय पक्ष हे तर केवळ जातीच्याच आधारावर कार्यकर्त्यांचा विचार करताना दिसतात. कार्यकर्ता किती चांगला आहे, तो जनतेसाठी किती वेळ देणार आहे, तो पक्षाचे काम किती वाढवू शकतो यापेक्षाही त्याचा समाज, त्याच्या मतदारसंघात किती राहतो, तो निवडून येऊ शकतो की नाही, पैसे पाण्याने तो बरोबर आहे की नाही याचा विचार साधारणत: राजकीय पक्ष करताना दिसतात. जातिगत राजकारणाच्या पलीकडे राजकारण कधी जाणार आहे? चांगल्या लोकांना राजकारणामध्ये आणून जनतेसमोर चांगले आदर्श कधी निर्माण करणार आहोत? याचा विचार राजकीय पक्षांनी व त्याच्या नेतृत्वाने करण्याची आवश्यकता आहे. सध्या भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर इतर पक्षांतील लोकांचा प्रवेश सुरू आहे. ठिकठिकाणी काँग्रेस कशी नामोहराम होईल, त्याला कसे खिंडार पडेल याचा प्रयत्न स्वाभाविकपणे भाजपद्वारे सुरू आहे. याच पृष्ठभूमीवर ज्या पक्षांना फारसे राजकीय भविष्य नाही असे ज्यांच्या कार्यकर्त्यांना वाटते, त्या पक्षामधून सुद्धा भाजपमध्ये येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. स्वाभाविकपणे येणारा मोठा नेता आपल्या सोबत त्याचे वलय, त्याचे कार्यकर्ते, पैसा, प्रसिद्धी, सर्वदूर असलेला संपर्क इत्यादी गोष्टी घेऊन येत असतो. त्यामुळे निवडणुकीच्या काळामध्ये तिकीट वाटप करीत असताना पक्षनेतृत्वाला स्वाभाविकपणे जिंकणारा कार्यकर्ता पाहिजे असतो. कार्यकर्ता जुना असेल, निष्ठावान असेल, परंतु जर तो जिंकू शकत नसेल असे नेतृत्वाला वाटत असेल तर नेतृत्व त्याला बाजूला करून पक्षातील असो की बाहेरून आलेला असो अशांवर आपला डाव खेळत असते. आणि येथूनच पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजीची सुरुवात होते. अनेक वर्षे पक्षामध्ये घालवणारे कार्यकर्ते शेवटची संधी म्हणून एकदा अपक्ष म्हणून उभे राहण्याचा प्रयत्न करतात किंवा इतर कुठल्या पक्षाकडून उभे राहण्याचा प्रयत्न करतात. बंडखोरी रोखण्यासाठी अगदी शेवटपर्यंत नाव निश्चित न करणे अशा पद्धतीचा प्रयत्न सुद्धा किंवा खेळी सुद्धा पक्षाकडून खेळली जात असते. सध्याच्या राजकारणामध्ये नामशेष होत चाललेली गोष्ट म्हणजे कार्यकर्ता होय. एकेकाळी काँग्रेसचा खूपच बोलबाला होता. काँग्रेसच्या तिकिटावर एखाद्या दगडाला सुद्धा उभे केले तरीसुद्धा लोक त्याला निवडून देत होते. याला कारण म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या आधीपासून काँग्रेस पक्ष कामात होता. त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वाभाविकपणे लोकांना परिचयाचे नाव काँग्रेसचे होते. काँग्रेसमध्ये मोठमोठे नेते होते. त्यामुळे निवडणुका सहजपणे जिंकल्या जात होत्या. परंतु पुढे मात्र जनतेने त्यांना नाकारले आणि मोदी सरकार सत्तेत आले.परंतु काँग्रेसची फाईव्ह स्टार संस्कृती, हाय कमांड संस्कृती हळूहळू सर्वच राजकीय पक्षांना चांगली वाटू लागली. जे दोष काँग्रेसमध्ये होते ते इतरही राजकीय पक्षांमध्ये निर्माण झाले. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांसमोरची सगळ्यात मोठी समस्या म्हणजे कार्यकर्ता आहे. आज सर्वच पक्ष हे नेत्यांच्या भोवती फिरणारे पक्ष आहेत. जनता सुद्धा एखाद्या नेत्याला पाहून त्याच्या पक्षाला विजयी करते आहे. त्यामुळे इतर पक्षांतून कार्यकर्ते आपल्या पक्षाशी जोडले पाहिजे असे न वाटता इतर पक्षातील नेते आपल्या पक्षाला जोडले पाहिजे अशी मानसिकता राजकीय पक्षांची झालेली आहे. काँग्रेसचे विकासविरोधी राजकारण, हिंदुत्वविरोधी राजकारण जनतेने नाकारले आणि पर्याय म्हणून भारतीय जनता पक्षाकडे त्यांनी बघितलेले आहे. सध्या तरी भारतीय जनता पक्ष सर्वत्र विजयी घोडदौड करीत आहे. परंतु एकेकाळी काँग्रेसची मुळे खोलवर गेलेली होती त्यामुळे त्यांना उखडून फेकण्याकरिता भाजपला जवळपास 65 वर्षे मेहनत करावी लागली.election results परंतु सगळ्यांना इतके वर्षे लागतील असे नाही हे लक्षात घेतले पाहिजे. मोदी लाट, मोदींचा करिष्मा हा भाजपाला सत्तेमध्ये बसविणारा सगळ्यात मोठा घटक आहे, ही गोष्ट नाकारता येणार नाही. मोदींनंतर भाजपाला इतक्या जागा मिळू शकेल की नाही अशी चिंता त्यांच्या पक्षातील लोकांनाही वाटते आहे. परंतु नेता कोणीही असो आम्ही गावागावात जाऊ, लोकांना संघटित करू आणि पक्षाला पुन्हा एकदा विजयी करू या गोष्टी भाषणातून नेते करू शकतात. परंतु त्यांना ही वस्तुस्थिती माहिती आहे की ते सर्व करण्यासाठी लागणारा कार्यकर्ता आपल्याकडे उरलेला नाही. कार्यकर्ता बनविण्यासाठी लागणारी कुठलीही कार्यपद्धती राजकीय पक्षांजवळ नसल्यामुळे व विचारधारेला तिलांजली दिलेली असल्यामुळे जोपर्यंत उतार आहे तोपर्यंत गाडी धावेल. परंतु चढाव आल्यानंतर खरोखरच ती चालू आहे की उतारावर धावत होती हे समजेल. याचा विचार सर्वच राजकीय पक्षांनी करण्याची आवश्यकता आहे.*

# संवाद शेतकरी महिलांशी : 'दीनदयाल'मधील स्वयंसिद्धांना कांचन गडकरी ऐकतात तेव्हा...

▸विदर्भ केसरी। यवतमाळ :

**"ताई, आमचे 'हे' सोडून गेले तेव्हा आयुष्यच कोलमडून पडलं होतं. लहान लेकरं, शेतीची चिंता, घर चालवायचं कसं—काहीच सुचत नव्हतं. पण या संस्थेतील लोक भाऊ म्हणून पुढे आले. 'तुला जे जमेल ते कर, आम्ही आहोत तुझ्या पाठीशी,' हा विश्वास त्यांनी दिला. आज त्याच आधारावर मी ताठ मानेनं जगते आहे," असे हृद्य आणि आत्मविश्वासपूर्ण मनोगत शिरसगाव (ता. नेर) येथील जयश्री सावंकार या स्वयंसिद्धेने व्यक्त केले.**

**यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांच्या जीवनात दीनदयाल सेवा प्रतिष्ठानने नवी आशा निर्माण केली आहे. दुःख कुरवाळत बसण्याऐवजी स्वाभिमानाने उभे राहण्याची ताकद या महिलांनी मिळवली असून, प्रत्येकीची एक स्वतंत्र यशोगाथा आज उभी आहे.**




**निळोणा येथील दीनदयाल प्रबोधिनी येथे दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित संवाद कार्यक्रमात संस्कार भारतीच्या विदर्भ प्रांत अध्यक्ष कांचन गडकरी यांनी या स्वयंसिद्ध महिलांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्ष ज्योती चव्हाण, सचिव विजय कद्रे आणि संचालक नीलिमा मंत्री उपस्थित होत्या.**

**जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील ३५ स्वयंसिद्धा भगिनी, परसबाग (किचन गार्डन) प्रकल्पातील २० महिला, तसेच पारधी बेड्यांवर आरोग्यविषयक कार्य करणाऱ्या आरोग्यरक्षक महिला या संवादात सहभागी झाल्या होत्या. परसबाग प्रकल्पातून स्वतःच्या कुटुंबाचे आरोग्य जपत उरलेली भाजी विकून आर्थिक स्वावलंबन साधणाऱ्या महिलांच्या अनुभवांनी उपस्थितांची मने जिंकली.**

**कांचन गडकरी यांनी प्रत्येक महिलेशी वैयक्तिक पातळीवर संवाद साधत, त्या कुठून आल्या, त्यांची कौटुंबिक व सामाजिक परिस्थिती काय होती आणि आज त्या कुठे पोहोचल्या आहेत, याची सविस्तर माहिती जाणून घेतली. एखाद्या मनोगतावेळी त्या गंभीर झाल्या, तर कधी डोळ्यांत पाणी आले, तर कधी चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले. समारोप करताना त्यांनी महिलांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.**

### त्या महिलांच्या पाठिशी खंबीरपणे

- **"हा देश जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर आणि झाशीच्या राणीचा आहे. त्यांनी दुःखावर रडायला नव्हे, तर लढायला शिकवले. त्यामुळे महिला अबला नसून सबला आहेत. अशा रणरागिणींच्या वंशज असलेल्या तुम्ही सर्वांनी परिस्थितीवर मात केली आहे. आता तुमच्यासारखं दुःख भोगणाऱ्या इतर महिलांनाही आधार द्या. तुमच्या प्रेरणेमुळे त्यांच्या पंखातही बळ येईल," असे त्या म्हणाल्या. दीनदयाल सेवा प्रतिष्ठान आणि या विचारधारेतील सर्व कार्यकर्ते अशा महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील, असा विश्वास कांचन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.**

# मुख्याध्यापक स्नेह मिलन व कार्यगौरव सोहळा

▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर

मूर्तिजापूर तालुक्यातील मुख्याध्यापकांमध्ये समन्वय वाढवण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, स्थानिक तिडके नगर येथील राम मंदिर सभागृहात 'मुख्याध्यापक स्नेह मिलन तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक कार्यगौरव सोहळ्याचे' भव्य आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व समाजसुधारकांच्या प्रतिमा पूजनाने व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले व प्रमुख उपस्थितीतांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्य उपाध्यक्ष शत्रुघ्न बिडकर तर, विशेष अतिथी म्हणून शिक्षक आमदार किरण सरनाईक, कार्याध्यक्ष बळीराम झामरे,संघटनेचे मार्गदर्शक एल आर देशमुख, जिल्हाध्यक्ष विलास खूमकर, जिल्हा सचिव दिनेश तायडे, जिल्हा कार्याध्यक्ष विजय ठोकळ, जिल्हा संघटन सचिव श्री राजेश पाथोडे महानगर सचिव दिपक बीडकर, व माजी मुख्याध्यापक गजानन बोचरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.




### शिक्षणाचे महत्त्व आणि मुख्याध्यापकांची भूमिका

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष शत्रुघ्न बिरकड होते. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी बदलत्या शिक्षण प्रवाहात मुख्याध्यापकांच्या जबाबदारीवर प्रकाश टाकला. विशेष अतिथी म्हणून आमदार किरण सरनाईक यांनी सेवानिवृत्त मुख्याध्यापकांच्या प्रदीर्घ अनुभवाचे कौतुक केले व शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव या सोहळ्यात केवळ सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचाच नव्हे, तर समाजातील विविध स्तरावर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचाही सत्कार करण्यात आला. यामध्ये

वऱ्हाडी कवी राजेंद्र भटकर यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला.

मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष अरविंद कोकाटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आमदार सरनाईक यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

आदर्श शाळा व्यवस्थापनासाठी कुंदन देशमुख, नवनिर्वाचित नगरसेवक गजानन नाकट आणि उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल प्रा. एल. डी. सरोदे यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. नूतन कार्यकारिणीचे स्वागत याप्रसंगी नवनियुक्त मुख्याध्यापक आणि मुख्याध्यापक संघाच्या नूतन कार्यकारिणीचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन सचिव देवानंद मुसळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष अरविंद कोकाटे, सचिव देवानंद मुसळे, संजीव देशमुख, विलास खाडे,अनील देविकर, राजेश देशमुख, प्रमोद महल्ले, प्रमोद ठाकरे, गणेश घाटे, दिपक बनारसे राजेंद्र खाडे यांच्यासह मुख्याध्यापक संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्याला तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षण प्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व निमंत्रितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. आभार मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष अरविंद कोकाटे यांनी मानले आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आरोपीला तात्काळ अटक करा

## राजेंद्र गायकवाड यांची मागणी

▸विदर्भ केसरी। यवतमाळ,

नगरपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर आरटीओ ऑफिस समोर दोन गटात हाणामारी झाली होती या प्रकरणांमध्ये शहर पोलिसांनी दोन्ही गटाच्या विरोधात गुन्हे दाखल केले होते दरम्यान यातील केवळ एका आरोपीला ताब्यात घेतले असून उर्वरित नऊ आरोपी अद्यापही बाहेर असल्याचा आरोप शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी केला असून तात्काळ सर्व आरोपींना ताब्यात घ्या अशा आशयाचे निवेदन पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्याकडे दिले आहे.

विजय मिरवणुकीच्या निमित्ताने दोन गट समोरासमोर आले आणि याच्यात वाद निर्माण झाला काही लोकांनी चाकू आणि पाईपने एकमेकांवर हल्ला चढविला यात तिघेजण जखमी झाले त्यातील एकाची प्रकृती गंभीर होती दरम्यान शहर पोलिसांकडे तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते या प्रकरणात मोहम्मद अजीम मोहम्मद अनीस याला अटक करण्यात आली मात्र उर्वरित नऊ आरोपी अजूनही बाहेर आहेत अतिशय गंभीर स्वरूपाचा गुन्हा असताना देखील पोलीस आरोपींना आणण्यामध्ये टाळाटाळ करीत असल्याचे यावरून दिसून येते, भविष्यात यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे तशी भीती परिसरातील नागरिक व्यक्त करीत आहे यातील फरार असलेले नऊ आरोपी हे त्यांच्या नातेवाईकांकडे लपून बसले असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून त्यांना तात्काळ ताब्यात घ्यावे, आणि त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. दिनांक 20 डिसेंबर 2025 रोजी वरील नमूद BNS कलमांन्वये एक गंभीर स्वरुपाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्ह्यात एकूण 9 आरोपींचा समावेश असून, आज दिनांकापर्यंत (7 दिवस उलटून गेले असतानाही) फक्त एकच आरोपी मोहमद अजिम मोहंमद अनीस यास अटक करण्यात आलेली आहे.

# नूतन नगराध्यक्ष डॉ. नयना उमेश तुळसकर यांचा पदग्रहण सोहळा संपन्न

▸विदर्भ केसरी।हिंगणघाट

नगरपरिषदेत नूतन नगराध्यक्ष म्हणून डॉ. नयना उमेश तुळसकर यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. या वेळी त्यांनी सर्वाधिक मतांनी निवडून दिल्याबद्दल शहरातील नागरिकांचे मनापासून आभार मानले. हिंगणघाटच्या विकासासाठी मिळालेली ही संधी पूर्ण ताकदीने साध्य करणार असल्याचा निर्धार त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला.




नगरपालिकेसाठी दीर्घकालीन विकास आराखडा राबविण्यावर भर देण्यात येणार असून शहरात रोजगाराच्या संधी निर्माण करणे, बंधारा निर्मिती, महिलांना सक्षम करणाऱ्या योजना तसेच बीसीसी ग्राउंड येथे क्रीडा विकासाला चालना देण्याचा मानस त्यांनी स्पष्ट केला. राजकारण बाजूला ठेवून केवळ विकासाला प्राधान्य देत हिंगणघाटला नव्या पर्वाकडे नेणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. या वेळी आमदार समीर कुणावार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, घनकचरा व्यवस्थापनासारख्या विषयांत नगरपालिकेने प्रभावी काम केले पाहिजे. गरीबांना घरकुल देण्यासाठी सर्वेक्षण, अतिक्रमणधारकांना पट्टे, बांधकाम परवाने, मृत्यू दाखले यांसारख्या सेवांसाठी ठरावीक कालमर्यादा निश्चित करून नागरिकांना वेळेत सेवा मिळावी, असे निर्देश त्यांनी दिले. नगरपालिकेला शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य देण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या पदग्रहण सोहळ्यास आमदार समीर कुणावार,नगराध्यक्षा डॉ नयना उमेश तुळसकर, जिल्हाध्यक्ष संजय गांते, सिंदी रेल्वेच्या नगराध्यक्ष राणी कलोडे, गटनेते भुषण पिसे, माजी नगराध्यक्ष मुरली मनोहर व्यास, रिपाईचे शंकर मुजेवार तसेच मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. हिंगणघाट नगरपालिका महाराष्ट्रातील व वर्धा जिल्ह्यातील एक क्रमांकाची नगरपालिका बनविण्याचा संकल्प या सोहळ्यातून व्यक्त झाला.

# "माणुसकीची अंत्ययात्रा" या काव्यसंग्रहास पद्मश्री स्मिता पाटील शब्दपेरा पुरस्कार जाहीर

▸विदर्भ केसरी। वाशीम

साहित्य क्षेत्रात अनेक वर्षे लिखाण करत असताना कवी/लेखक/पत्रकार प्रदीप बडदे यांचा पहिला कविता संग्रह "माणुसकीची अंत्ययात्रा" ललित पब्लिकेशन, मुंबई तर्फे नुकताच प्रकाशित झाला. माणुसकीच्या अंतापर्यंत जाऊन तिच्या पुनर्निर्मितीचा शोध घेणाऱ्या या संग्रहाची गिरणा गौरव प्रतिष्ठान, नाशिकने दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांना पद्मश्री स्मिता पाटील शब्दपेरा पुरस्कार जाहीर करण्यात आला. साहित्य उपेक्षितांचे या मासिकाचे ते कार्यकारी संपादक असून मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे व गुजरात येथील विविध साहित्यिक मंचावर संचालक व मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. प्रदीप बडदे हे गेल्या २० वर्षांपासून साहित्यक्षेत्रात कार्यरत असून राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व राष्ट्रस्तरीय अशी ५० हून अधिक पारितोषिके व पुरस्कार त्यांना प्राप्त आहेत.




गिरणा गौरव प्रतिष्ठान, नाशिकचा स्मिता पाटील शब्दपेरा पुरस्कार सोहळा हा अखिल भारतीय लोककला शेकोटी साहित्य संमेलनादरम्यान दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ठीक १ वाजता नाशिक येथे होणार असल्याची माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष रवींद्र मांजुलकर आणि प्रा.राजेश्वर शेळके यांनी दिली आहे. या कार्यक्रमाचे स्वरूप आणि नियोजन खूप भव्य व देखणे असते, शिवाय या कार्यक्रमाला पाहुणे, साहित्यिक, पत्रकार, समाजबांधव, लोकसंगितकार, कलाकार व चाहत्या प्रेक्षकवर्गाची आवर्जून उपस्थिती लाभणार आहे. प्रदीप बडदे यांच्या काव्यसंग्रहाला हा पहिलाच पुरस्कार जाहीर झाला असून या सन्मानाबद्दल साहित्य क्षेत्रात चर्चा व कौतुक केले जात आहे. मित्रपरिवार, चाहते आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर शुभाशिर्वाद आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# निष्ठावान 'कट्टर' कार्यकर्त्याची दखल घेणार का?

## कृष्णा पुसनाके यांना स्वीकृत नगरसेवक करण्याची यवतमाळमध्ये जोरदार मागणी

▸विदर्भ केसरी। यवतमाळ

यवतमाळ: आजच्या बदलत्या राजकीय वातावरणात अनेक युवक सत्तेच्या मागे धावत असताना, यवतमाळमधील काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते कृष्णा पुसनाके यांनी मात्र आपली पक्षनिष्ठा आणि जनसेवा अविरतपणे सुरू ठेवली आहे. नुकत्याच पार पडलेल्या यवतमाळ नगर परिषद निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे १५ नगरसेवक निवडून आले असून, या यशानंतर आता अनेक वर्षांपासून पक्षासाठी अहोरात्र झटणाऱ्या कृष्णा पुसनाके यांच्या कार्याची योग्य दखल घेण्याची वेळ आली असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्यांना नगर परिषदेत 'स्वीकृत नगरसेवक' म्हणून संधी द्यावी, ही मागणी आता जोर धरू लागली आहे.

कृष्णा पुसनाके यांची ओळख काँग्रेसचा एक 'कडवट आणि कट्टर' कार्यकर्ता म्हणून आहे. जेव्हा जेव्हा सत्ताधारी पक्षाने किंवा इतर विरोधकांनी काँग्रेसवर टीका केली, तेव्हा कृष्णा यांनी नेहमीच ढाल बनून पक्षाचे संरक्षण केले आणि तलवार बनून विरोधकांवर प्रहार केला आहे. अनेकदा सत्ताधारी पक्षांच्या दिग्गज नेत्यांनी केलेल्या टीकेला त्यांनी सडेतोड प्रत्युत्तर देऊन काँग्रेसची बाजू भक्कमपणे मांडली आहे. पक्ष कठीण काळात असताना डगमगून न जाता आक्रमकपणे समोर जाण्याची त्यांची ही वृत्ती कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

'सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष' आणि 'जिल्हा उपाध्यक्ष' या जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी केवळ पदालाच न्याय दिला नाही, तर शेतकरी, मजूर आणि सामान्यांचे प्रश्न हिरीरीने मांडले. सोयाबीनला ६ हजार रुपये भाव मिळवण्यासाठी त्यांनी दिलेला लढा असो वा 'हर घर संविधान' हे जनजागृती अभियान, प्रत्येक वेळी त्यांनी आपली संघटनात्मक ताकद आणि सामाजिक बांधिलकी सिद्ध केली आहे. माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माणिकराव ठाकरे, वसंतराव पुरके आणि यवतमाळचे विद्यमान आमदार बाळासाहेब मांगुळकर यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले कृष्णा पुसनाके आंदोलनांच्या माध्यमातून प्रशासनाला धारेवर धरण्यासाठी ओळखले जातात. त्यांच्या या निस्वार्थ आणि आक्रमक कर्तृत्वाचा सन्मान करून त्यांना नगर परिषदेत प्रतिनिधित्व दिल्यास, सर्वसामान्य जनतेचे आणि विशेषतः तरुणांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जातील, असा ठाम विश्वास यवतमाळच्या नागरिकांनी व्यक्त केला आहे.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,

Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY

गडचिरोली GOOD MORNING

## मरेगाव (टोली) परिसरात ४७ हजारांचा मुद्देमाल नष्ट; दोन दारू विक्रेत्यांवर गुन्हा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : गडचिरोली तालुक्यातील मरेगाव टोला येथे दारू विक्री विरोधात आरमोरी पोलिस व मुक्तिपथ तालुका चमूने संयुक्तपणे 'अहिंसक कृती' करत मोठी कारवाई केली. या कारवाईत हातभट्टीची दारू व मोह सडवा, असा सुमारे ४७ हजार रुपयांचा मुद्देमाल शुक्रवारी घटनास्थळीच नष्ट करण्यात आला. तसेच दोन दारू विक्रेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मरेगाव येथील मुख्य गावात दारूविक्री बंद करण्यात यश आले असले, तरी टोला भागात काही विक्रेते अद्याप सक्रिय असल्याचे निदर्शनास आले होते. संशयित विक्रेत्याच्या शेतात धाड टाकली असता, तेथे जिवंत हातभट्टी व मोह सडवा भरलेले ९ प्लास्टिक ड्रम आढळले. पथकाने घटनास्थळीच संपूर्ण साठा नष्ट केला. याप्रकरणी दारूविक्रेते चंद्रभान पोटावी व मनोहर पोटावी यांच्याविरुद्ध आरमोरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक नरेश सहारे व पथकाने केली.

## संक्षीप्त



### रात्रो आणि दिवसा ओपन प्रौढ भव्य कबड्डी स्पर्धा संमेलन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : दिनांक २८/१२/२०२५ रोजी मौजा वासीटोला/काशी ता.कुरखेडा जि.गडचिरोली येथे नवयुवक बिरसा मुंडा समिति वासीटोला/काशी यांच्या सौजन्या ने आयोजित " भव्य रात्रो व दिवस ओपन प्रौढ़ कबड्डी सम्मेलन" या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारोह प्रसंगी कार्यक्रमाचे विशेष अतिथि म्हणून दिनेशभाऊ सिडाम सामाजिक कार्यकर्ते तथा मा. सरपंच यांनी उपस्थिति दर्शवली व सत्कार स्वीकारून उपस्थित खेडाळु, गावातिल ग्रामवासियांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जीवन पा.नाट ता. अध्यक्ष कांग्रेस कमेटी कुरखेडा तथा मा. उपाध्यक्ष जि. प. गडचिरोली, अध्यक्ष म्हणून बाबुरावजी कुमरे सरपंच सोनेरांगी, उपाध्यक्ष म्हणून गुरूदेवजी निकोडे उपसरपंच सोनेरांगी, संजय कुमरे सा. कार्यकर्ते, युवराज घोडाम अध्यक्ष, किशोर कुमरे अध्यक्ष ग्राम कोश समिति, अशोक कोल्हे, वासुदेव कोल्हे, केशव कुमरे, तुळशीराम कोल्हे, प्रभुदास तुलावी पो.पा., गिरीधर घोडाम, योगेश मानकर, रविन्द्र कोल्हे, अरूण कुमरे, सोनु घोडाम, मिनाताई कोल्हे अध्यक्ष महिला बचत गट, शामलता कोल्हे, सुप्रिया कुमरे, प्रतिभा कोल्हे, आशाताई कोल्हे, अन्य मान्य. मंडळी व परिसरातील गावातील ग्रामवासीय मोठया संख्येने उपस्थित होते.





### कोलूपदीकसा येथे दोन दिवसीय पुरुष भव्य ओपन कबड्डी स्पर्धेचे आयोजन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : कोरची तालुक्यातील मौजा कोलूपदीकसा येथे वीर शिवाजी क्लबच्या वतीने दोन दिवसीय पुरुष भव्य ओपन कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार श्री रामदास मसराम यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी आमदार रामदास मसराम यांनी उपस्थित खेळाडू व युवकांना क्रीडास्पर्धांमधून शिस्त, संघभावना व आरोग्याचा विकास होतो, असे मार्गदर्शन केले. त्यांनी ग्रामीण भागातील क्रीडाप्रतिभेला प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. या स्पर्धेत विविध गावांतील संघांनी सहभाग नोंदविला असून सामन्यांदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. स्पर्धेला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल वीर शिवाजी क्लबचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. स्पर्धा उत्साहात व शांततेत पार पडली. या वेळी काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष मनोज अग्रवाल, प्रताप सिंग गजभिये, मानसिंगजी नैताम (सरपंच), महेश नरोटे, माजी सभापती कचरीताई काटेंगे, जगदीश कपूरडेरिया, माजी सरपंच तुलाराम माडावी, सरपंच शांताबाई मडावी, जगदीश काटेंगे, उपसरपंच जीवनलाल नरोटे, अमोल कल्लो, बलीयार मडावी, राहुल मलगाम, रूपचंद देशमुख, काशीराम मडावी, दयाराम गोटा, धनुरामजी कल्लो, जगदीश उईके, पंजाबराव उईके आदी मान्यवर उपस्थित होते.

### मतीमंद प्रवर्गातील दिव्यांगासाठी (LLC) लोकल लेवल समिती (स्थानिक स्तर समिती) मध्ये अर्ज करण्याचे आवाहन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यातील मतीमंद प्रवर्गातील अठरा वर्षावरील दिव्यांग व्यक्तींसाठी रक्तातील इतर नातेवाईक यांनी त्यांचे कायदेशीर पालकत्व स्वीकारण्यासाठी नॅशनल ट्रस्ट १९९९ अंतर्गत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय जिल्हा परिषद यांचे कार्यालयास आर्ज प्राप्त होत नसल्याने मतीमंद प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहत असल्याने. सदर योजने करिता कार्यालयास अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी केले आहे.

### प्रेमप्रकरणातून तरुणाचा धारदार शस्त्राने खून

पुण्यातील आंबेगाव परिसरात प्रेमप्रकरणातून एका तरुणाचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला आहे. जावेद ख्वाजामियाँ पठाण (वय ३४, रा. नांदेड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी संदीप रंगराव भुरके (वय २५) आणि त्याच्या एका साथीदाराविरुद्ध आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रौफ उस्मान शेख (वय ३५, रा. नऱ्हे, मूळ रा. नांदेड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी रौफ शेख यांचा जावेद पठाण हा भाऊ होता. जावेद पुण्यात एका ठिकाणी काम करत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जावेदची आरोपी संदीप भुरके याच्या नात्यातील एका तरुणीशी ओळख झाली होती. या ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. आरोपी संदीपचा या प्रेमप्रकरणाला तीव्र विरोध होता. पठाण आंबेगाव परिसरातील गायमुख येथे थांबला असताना, आरोपी संदीप आणि त्याच्या साथीदारांनी त्याला गाठले. त्यांनी जावेदला तरुणीसोबतचे प्रेमसंबंध तोडण्यास सांगितले. यावरून त्यांच्यात वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन आरोपी संदीप आणि त्याच्या मित्राने जावेदवर धारदार शस्त्राने अनेक वार केले.

# आरमोरीतील उपप्रादेशिक कार्यालयाचे बांधकाम १५ वर्षापासून रखडले

## किरायाच्या खोलीतच चालतो कारभार : लक्ष देण्याची मागणी


▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

> ८८ उपप्रादेशिक कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी २०१४ मध्ये भूमीपूजन पार पडले होते. मात्र त्यानंतर बांधकामास सुरुवातच झाली नाही. याबाबत वरिष्ठांकडे पाठपुरावा केला आहे. भाड्याच्या खोलीत असलेल्या इमारतीतून काम करतांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. कार्यालयाच्या स्वतंत्र इमारत शासनाने त्वरित उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.
> — - **व्ही. सू. सोनवने**,उपप्रादेशिक व्यवस्थापक, आरमोरी.

आरमोरी : आरमोरी येथील उप-प्रादेशिक कार्यालयाच्या इमारतीसाठी शासन स्तरावरुन निधी मंजूर करण्यात आला. २०१४ मध्ये रितसर बांधकामाचे भूमिपूजनही करण्यात आले. मात्र त्यांनतर तब्बल पंधरा वर्षापासून बांधकामाचा पत्ताच नाही. त्यामुळे उप्रप्रादेशिक कार्यालयाचे बांधकाम होणार की नाही, असा संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे आजही उपप्रादेशिक कार्यालयाचा संपूर्ण कारभार भाड्याच्या खोलीतूनच चालविला जात आहे. शहरातील ब्रम्हपूरी राष्ट्रीय मार्गालगत बर्डी टि-पाईंटला लागून असलेल्या एका खाजगी व्यक्तीच्या घरात महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक-२ उप्रपादेशिक कार्यालयाचे कामकाज चालविले जात आहे. एकीकडे सर्वच शासकीय कार्यालयांना स्वतंत्र इमारत असावी, असे राज्य शासनाचे धोरण आहे. याअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातही अनेक शासकीय विभागांना स्वतंत्र इमारत प्राप्त झाली आहे. मात्र संपूर्ण पावसाळ्यात लागते इमारतीला गळती. मागील अनेक वर्षापासून सदर कार्यालयाचे कामकाज खासगी व्यक्तीच्या घरातील भाड्याच्या खोलीतून सुरू आहे. सदर खोलीत अपुरी जागा असल्याने कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

तर पावसाळ्यात सदर इमारत गळत असल्याने कर्मचाऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. यात दस्ताऐवज खराब होण्याचा धोका कायम आहे. स्वतंत्र इमारतीसाठी वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव सादर करूनही इमारतीचे बांधकाम थंडबस्त्यात पडल्याचे दिसून येत आहे. याकडे संबंधित विभागाच्या वरिष्ठांनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या धान खरेदी विक्रीचा व्यवहार चालविणाऱ्या आरमोरी येथील उप्रपादेशिक कार्यालयाला अद्यापही हक्काची इमारत मिळाली नसल्याचे धक्कादायक वास्तव आहे. मागील अनेक वर्षापासून एका खाजगी व्यक्तीच्या घरातील खोली भाड्याने घेऊन या अपुऱ्या जागेत कार्यालयीन कामकाज केले जात आहे. विशेष म्हणजे उपप्रादेशिक कार्यालयासाठी शासनाकडून निधी मंजूर करण्यात आला होता. याअंतर्गत संबंधित इमारतीच्या बांधकामासाठी भूमिपूजनाचा कार्यक्रमही उरकवून टाकण्यात आला. मात्र त्यानंतर तब्बल १५ वर्षांपासून प्रत्यक्षात या इमारतीच्या बांधकामाला कामाला प्रारंभझालेला नाही. परिणामी संबंधित अधिकारी तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांना नानाविध अडचणींना तोंड देत कामकाज करावा लागत आहे. इमारत मंजुरीनंतर प्रत्यक्षात बांधकामाला सुरुवात न झाल्याने शासनाचा निधी कुठे गडप झाला? बांधकामास सुरुवात होण्यास अडचण निर्माण का झाली आहे असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. स्वतंत्र इमारत साकारणार का नाही, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. आदिवासी जिल्ह्याला सुजलाम सुफलाम करण्याचे शासनाचे धोरण आहे. मात्र आदिवासी विकास महा मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालयाला अनेक दशकाच्या कालावधीनंतरही स्वतंत्र इमारत मिळू न शकणे, ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. स्वतंत्र इमारतीसाठी आणखी किती प्रतीक्षा करावी लागणार? असा प्रश्न जनतेकडून उपस्थित केल्या जात आहे.





## येडापूर मध्ये बिबट्याचे दर्शन : गावक-यांत दहशत

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

कुरखेडा : कुरखेडा तालुक्यातील पुराडा वन विभागात अंतर्गत येत असलेल्या मौजा येडापुर येथे आज दुपारी गावालगत असलेल्या शेत शिवारात बिबट एका छोट्या मुलीला व काम करणारा महिलेला दिसल्याने एकच आरडा ओरडा सुरू झाली असता बिबट्याने शेत शिवारालगत असलेल्या सुखदेव कवडो यांच्या बाथरूम मध्ये दडून बसला असता गावकऱ्यांनी सरपंच मोहन पुराम यांनी बाथरूमचा दरवाजा बंद करून बिबट्याला बंदिस्त केले. व लगेच उराळा येथील वन विभागाला बिबट्या संदर्भात माहिती दिली. परंतु वन विभागातील टीम हे तब्बल तीन ते चार तास गावात उशीर आल्याने गावातील सरपंच व नागरिकांनी वनविभागातील कर्मचाऱ्यावर नाराजी व्यक्त केली आहे. गावात बिबट्याचे दर्शन झाल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आज शेत शिवाला लागून असलेल्या घरच्या एका छोटी मुलगी शौचालयात गेली असता तिला बिबट दिसला. तेव्हा ती आरडा ओरडा करू लागली व लगेच महिलेला सुद्धा बिबट दिसल्याने त्या दोघेही घाबरून आरडा ओरड सुरू केल्याने बिबट हा गावच्या मार्गाने जाऊन बाथरूम मध्ये दळून सहारा घेतला असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.

## अज्ञात वाहनाची दुचाकीला पाठीमागून दिली धडक : चिमुकलीचा जागीच मृत्यू

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे



चंद्रपूर : अज्ञात वाहनाने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने अवघ्या सहा वर्षीय चिमुकलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर आई-वडील व लहान बहिण जखमी झाल्याची घटना काल रविवारी दुपारच्या सुमारास चंद्रपूर जिल्ह्याच्या गोंडपिपरी तालुक्यातील गोंडपिपरी-वढोली मार्गावर घडली.

अपघातात ६ वर्षीय आयुषी विपुल नागपुरे रा.सोमनपल्ली,ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर असे मृत पावलेल्या चिमुकलीचे नाव आहे.

विपुल नागपुरे हे पत्नी, मोठी मुलगी आयुषी व लहान मुलीसह दुचाकीने जात असतांना वढोली मार्गावर येताच त्यांच्या दुचाकीला पाठीमागून अज्ञात वाहनाची जोरदार धडक बसली. धडकेत नागपुरे दाम्पत्य खाली कोसळले. यात आयुषीला गंभीर दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. लागलीच आयुषी तिचे आई-वडील व लहान बहिणीला तातडीने गोंडपिपरी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचार सुरू असतांनाच आयुषीचा मृत्यू झाला. अपघातात जखमी झालेल्या पालक व लहान बहिणीची प्रकृती स्थिर असून पोलिसांनी अपघातग्रस्त दुचाकी ताब्यात घेतली आहे, तर धडक देणाऱ्या अज्ञात वाहनचालकाचा शोध सुरू आहे.

## परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज, पदमभुषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली व आरोग्य शिक्षण पथक, तासगांव या संस्थेच्या गट - ड सरळसेवा पदभरती ही परिक्षा गडचिरोली येथील शासकीय सायन्स कॉलेज गडचिरोली, चामोर्शी रोड कन्नमवार नगर गडचिरोली परिक्षा केद्रावर दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता च्या कालावधीत घेण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय परीक्षा एजन्सी यांच्यामार्फत आयोजित UGC NET Decemder २०२५ (Computer Based Test) ही परिक्षा गडचिरोली येथील शासकीय विज्ञान महाविद्यालय, चामोर्शी रोड. गडचिरोली परिक्षा केंद्रावर दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी ते ०७ जानेवारी २०२६ सकाळी ७.०० ते दुपारी १२.०० वाजता (सकाळ सत्र) व दुपारी १.०० ते ६.०० वाजता (दुपार सत्र) च्या कालावधीत घेण्यात येणार आहे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक ०४ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र गट - ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पुर्व परिक्षा २०२५ ही परिक्षा गडचिरोली येथील दहा परिक्षा उपकेंद्रावर (शाळा / महाविद्यालयांत) सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० पर्यंत च्या कालावधीत घेण्यात येणार आहे.

परिक्षा केंद्रावर परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पडतील व तेथील परिक्षार्थींना तणावमुक्त वातावरणात परिक्षा देणे शक्य होईल अशी व्यवस्था करावी म्हणून परिक्षा केंद्रांच्या परिसरात 200 मीटर अंतरापर्यंत भारतीय सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये मनाई हुकुम जारी करणे हे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता आवश्यक झाले आहे. त्याअनुषंगाने जिल्हादंडाधिकारी, अविश्यांत पंडा यांना प्राप्त अधिकाराअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये सदर परिक्षा सुरळीतपणे व पारदर्शकपणे पार पाडण्याच्या दृष्टीने सदर परिक्षा केंद्राच्या 200 मिटर अंतरापर्यंत पुढीलप्रमाणे बाबी/ कृत्ये करण्यास प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे. निषिद्ध क्षेत्रात झेरॉक्स मशीन, फॅक्स, व एस टी डी बुथ, परिक्षा कालावधीत सुरु राहणार नाही.

परिक्षा केंद्रात व परिसरात मोबाईल फोन, लॅपटॉप, पेजर, टेपरेकॉर्डर, कॅमेरा इत्यादींचा वापर करता येणार नाही. निषिद्ध क्षेत्रात नारेबाजी करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, भाषण करणे, घोषणा करता येणार नाही. पाच पेक्षा जास्त इसम एकत्र येणार नाहीत. शस्त्र, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, सुरे, काठ्या किंवा लाठया किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी इतर कोणतीही वस्तु बरोबर ठेवता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेता येणार नाही. परिक्षा केंद्रापासून 200 मीटर अंतरावर चुन्याची लाईन आखण्यात यावी. कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी बाधा उत्पन्न करण्यात येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यकतीस/ वाहनास प्रवेशास मनाई राहील. सदर आदेश कर्तव्य बजावणारे वरिष्ठ अधिकारी, आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तैनात करण्यात आलेले वरिष्ठ पोलिस अधिकारी यांना लागू राहणार नाही. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी परिक्षेच्या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होणार नाही या दृष्टीने सुक्ष्म नियोजन करून आवश्यक पोलीस बंदोबस्त लावण्याची कार्यवाही व जबाबदारी पार पाडावी. सदर अधिसूचनेतील कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध फौजदारी नियमांतर्गत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. सदर आदेश परिक्षेच्या दिनांकास अमलात राहील असे जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांनी कळविले आहे.

# भांडवलदारांच्या विकासासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी हिरावल्या जाणार, संघर्षासाठी सज्ज राहा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी :

गडचिरोली : जिल्ह्यात भांडवलदारांचे हित साधणारा तथाकथित विकास लादला जात असून, या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या शेतजमिनी हिरावून घेण्याचा डाव आखला जात आहे. नेत्यांच्या मागे धावून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. आपली जमीन, हक्क आणि अस्तित्व वाचवायचे असतील तर शेतकऱ्यांनी स्वतःच संघर्षासाठी सज्ज राहावे, असे परखड आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई रामदास जराते यांनी केले. ते तालुक्यातील मुडझा येथे महर्षी वाल्मिकी ऋषी मंदिराच्या मदतनिधीसाठी आयोजित नाटकाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका करत, रोजगार हमी योजनेच्या कायद्यात दुरुस्तीच्या नावाखाली गरिबांच्या हातातील रोजगार हिरावून घेण्याचे कारस्थान रचले जात असल्याचा आरोप केला. ग्रामीण व शेतकरी समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात संघटित लढ्याशिवाय पर्याय नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या नाटकाचे उद्घाटन शेतकरी कामगार पक्षाच्या महिला नेत्या जयश्रीताई जराते व ठिवर समाज संघटनेचे जिल्हा सचिव किशोर बावणे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास मुडझाचे सरपंच शशिकांत कोवे, आझाद समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष राज बन्सोड, शेकापचे खजिनदार भाई शामसुंदर उराडे, जिल्हा समिती सदस्य डॉ. गुरुदास सेमस्कर, भटक्या-विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष डंबाजी भोयर, तुलाराम राऊत, तंमुस अध्यक्ष श्रीहरी चौधरी, उपसरपंच शोभाताई जेंगठे, ग्रामपंचायत सदस्य विवेक बारसिंगे, संजय चौधरी, गौरव सोनूले, राजू चौधरी, किशोर ठाकरे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## भाई रामदास जराते यांचे शेतकऱ्यांना थेट आवाहन...!



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे उपाध्यक्ष लक्ष्मण शेंडे, सचिव खुशाल मेश्राम यांच्यासह बाळू शेंडे, रविंद्र शेंडे, प्रभाकर भोयर, विठ्ठल मेश्राम, पंकज शेरकी, पद्माकर कांबळे, विजय शेंडे, किरण भोयर, उमाजी शेंडे, विलास शेरकी, कृष्णा भोयर, कृष्णा शेंडे, लखन शेरकी, अजय भोयर, विठ्ठल भोयर तसेच शिक्षक बोरीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

# चंद्रपूर

GOOD MORNING

## भीमथडी जत्रे'त चोरट्यांकडून हातसाफ : 55 हजारांची रोकड लांबवली

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

'भीमथडी' जत्रेतील एका स्टॉलमधून ५५ हजारांची रोकड चोरट्यांनी लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला मूळच्या इंदापूरमधील बेलवडी-थोरातवाडी गावातील रहिवासी आहे. महिला आणि गावातील बचत गटातील महिलांनी कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित केलेल्या 'भीमथडी' जत्रेत खाद्यपदार्थांचा स्टॉल लावला आहे. गुरुवारी (२५ डिसेंबर) नाताळची सुट्टी असल्याने 'भीमथडी' जत्रेत गर्दी झाली होती. खाद्यपदार्थ विक्रीतून जमा झालेली रोकड महिलेने स्टॉलमधील स्टिलच्या डब्यात ठेवली होती. सायंकाळी साडेसातच्या सुमारास चोरट्यांनी स्टिलच्या डब्यात ठेवलेली ५५ हजारांची रोकड लांबविली. याबाबत सर्वत्र शोधा शोध करूनही पैसे मिळाले नाही, अखेर तक्रारदारांनी याबाबत पोलिसांकडे फिरत दाखल केली आहे. पोलीस उपनिरीक्षक एस जाधव पुढील तपास करत आहेत.

## संक्षीप्त







### आमदार रामदास मसराम यांच्या स्थानिक विकास निधीतून सभागृहाचे लोकार्पण

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : कोरची तालुक्यातील मौजा कोलूपदीकसा येथे २७ डिसेंबर २०२५ रोजी आमदार श्री रामदासजी मसराम यांच्या स्थानिक विकास निधीतून उभारण्यात आलेल्या सभागृहाचे लोकार्पण आमदार श्री रामदासजी मसराम यांच्या हस्ते करण्यात आले. या लोकार्पण सोहळ्यामुळे गावातील सामाजिक, सांस्कृतिक तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत. या वेळी काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष मनोज अग्रवाल, प्रताप सिंग गजभिये, मानसिंगजी नैताम (सरपंच), महेश नरोटे, माजी सभापती कचरीताई काटेंगे, जगदीश कपूरडेरिया, माजी सरपंच तुलाराम माडावी, सरपंच शांताबाई मडावी, जगदीश काटेंगे, उपसरपंच जीवनलाल नरोटे, अमोल कल्लो, बलीयार मडावी, राहुल मलगाम, रूपचंद देशमुख, काशीराम मडावी, दयाराम गोटा, धनुरामजी कल्लो, जगदीश उईके, पंजाबराव उईके आदी मान्यवर उपस्थित होते.



### परसोडा देवी-वलगाव रस्त्याची दुरवस्था, नागरिकांना त्रास : दुरुस्तीची मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

चांदूरबाजार तालुक्यातील परसोडा देवी-वलगाव रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी परसोडा देवी येथील गावकऱ्यांनी केली आहे. या संदर्भात नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंता (एसडीई) यांना निवेदन दिले आहे. परसोडा देवी ते वलगाव या रस्त्याची स्थिती अत्यंत वाईट झाली आहे. रस्त्यावरील डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून आतील दगड बाहेर आले आहेत. तसेच, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खराब रस्त्यामुळे दुचाकी चालवणे अत्यंत अवघड झाले आहे. हा रस्ता परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि रुग्णवाहिकांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावरील दगड बाहेर आल्याने वाहने घसरून अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाळ्यात तर या रस्त्याची अवस्था अधिकच बिकट होते. ग्रामस्थांनी गेल्या काही महिन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाला या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अनेक निवेदने दिली आहेत. निवेदन सादर करतेवेळी मुन्ना बोंडे, रणजित टेकाडे, अभी निंभोरकर, नाना भोंडे, राहुल निंभोरकर, कैलास लगड, शरद निंभोरकर, नंदू निंभोरकर, नंदकिशोर गुबरे, दीपक टेकाड आणि अनिल निंभोरकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.




### बहिरम यात्रेतील दवाखाना शनिवारी बंद : भाविकांची होतेय गैरसोय

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

चांदूर बाजार तालुक्यातील प्रसिद्ध बहिरम यात्रेतील दवाखाना शनिवारी (२७) बंद होता. यामुळे यात्रेकरूंना वैद्यकीय उपचारांविना गैरसोयीचा सामना करावा लागला. गेल्या दोन आठवड्यांपूर्वी सुरू झालेल्या या यात्रेत अवघ्या काही दिवसांतच गैरव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक बहिरम यात्रेसाठी येतात. मात्र यावर्षी पार्किंगसाठी जास्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत. आरोग्य सेवाही अनियमित असल्याने मूलभूत सुविधांबाबत भाविकांमध्ये तीव्र नाराजी आहे. ठरवून दिलेल्या दरांपेक्षा जास्त पैसे आकारले जात असतानाही पंचायत समिती अधिकाऱ्यांचे यावर नियंत्रण नसल्याचे भाविकांचे म्हणणे आहे. यात्रा अधीक्षक रामेश्वर रामागडे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी समाधानकारक माहिती दिली. मात्र, त्यांनी दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात मोठी तफावत असल्याचे दिसून आले. यामुळे यावर्षीच्या यात्रा व्यवस्थापनाकडे पंचायत समिती अधिकाऱ्यांचे पुरेसे लक्ष नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यात्रेच्या पहिल्याच शनिवारी (२७) दवाखाना बंद असल्याने अनेक यात्रेकरूंचा हिरमोड झाला. दरवर्षी यात्रेत छोटी-मोठी पडझड, अचानक आजारी पडणे, चक्कर येणे, भाजणे किंवा जखम होणे अशा घटना घडतात. त्या दिवशीही अशाच काही घटना घडल्या.

# गडचिरोली रिंग रोडला मंजुरी द्या

## नगराध्यक्ष ॲड .प्रणोती निंबोरकर यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



गडचिरोली : गडचिरोली नगर परिषदेतून प्रचंड मताधिक्याने विजयी झालेल्या नगराध्यक्ष ॲड. प्रणोती निंबोरकर यांनी विजयाचा उत्साह न दवडता शहराच्या विकासाची धुरा तत्काळ हाती घेतली. निवडून आल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन शहरातील महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

ॲड. प्रणोती निंबोरकर यांनी गडचिरोली शहरासाठी रिंग रोडची तातडीची गरज अधोरेखित केली. सतत वाढत असलेली वाहतूक आणि शहरातील अरुंद रस्त्यांमुळे निर्माण होणारा ताण लक्षात घेता गडचिरोलीसाठी रिंग रोड आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पाला मंजुरी देऊन पुढील पावले उचलावी, अशी मागणी त्यांनी फडणवीस यांच्याकडे केली.

रिंग रोड व्यतिरिक्त शहरातील मूलभूत सुविधा, पायाभूत विकास, निधी उपलब्धता तसेच नागरिकांच्या रोजच्या समस्या या विषयांवरही निंबोरकर यांनी चर्चा केली. गडचिरोलीच्या सर्वांगीण विकासाकरिता आवश्यक ते सर्व पाठबळ देण्याची विनंती त्यांनी यावेळी केली. गडचिरोली शहराचा विकास करण्यासाठी आपण कटीबद्ध आहोत, अशी ग्वाही निंबोरकर यांनी मुख्यमंत्र्यांना दिली. विजयानंतर मुख्यमंत्र्यांकडून आशीर्वाद घेत शहराच्या विकासयात्रेची पहिली पायरी टाकल्याने पक्षांतर्गत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. भेटीच्या वेळी गडचिरोली प्रभारी तथा आमदार कीर्तिकुमार भांगडिया, माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी, डॉ. देवराव होळी, माजी जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, महामंत्री गोविंद सारडा, युवा नेते सागर निंबोरकर आदी उपस्थित होते.

गडचिरोलीतील विकासकामांसाठी राजकीय पातळीवर झालेल्या या पहिल्या पुढाकाराकडे स्थानिकांनी आशेने पाहिले असून, आगामी काळात शहराच्या विकासाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# देसाईगंजमध्ये भीषण अपघात ; दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू तर, एक जण किरकोळ जखमी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

देसाईगंज : शहरात रविवारी (२८ डिसेंबर) रात्री सुमारे ७:३० वाजताच्या सुमारास घडलेल्या भीषण अपघातात २७ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा सहकारी मित्र जखमी झाल्याची घटना देसाईगंज शहराच्या मुख्य मार्गावरील हुतात्मा स्मारकाजवळ घडली. या अपघातात प्रदीप उर्फ मोंटू हरबा मुंगीकोल्हे (वय २७, रा. मेढेंबोडी, वैरागड, ता. आरमोरी, जि. गडचिरोली) याचा जागीच मृत्यू झाला. तर त्याचा मित्र विजय देवगडे (वय १८) हा किरकोळ जखमी झाला आहे.

प्राप्त माहितीनुसार, प्रदीप व विजय हे दोघेही दुचाकीने वैरागडजवळील मेढेंबोडी येथून देसाईगंज तालुक्यातील सावंगी येथे काही कामानिमित्त जात होते. देसाईगंज शहरात प्रवेश करताच हुतात्मा स्मारकाजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत प्रदीप दुचाकीवरून खाली फेकला गेला. त्याच्या डोक्याला गंभीर मार लागून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

अपघातात जखमी झालेल्या विजय देवगडेला तत्काळ देसाईगंज ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच देसाईगंज पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी देसाईगंज ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. अपघातानंतर घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे काही काळ मुख्य मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. या प्रकरणाचा पुढील तपास देसाईगंज पोलीस करीत आहे.




# मावळत्या वर्षाला रक्तदानाने निरोप देण्याची १६ वर्षाची परंपरा कायम राहणार

## नगरसेवक सागर निरंकारी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



कुरखेडा : स्वर्गीय विक्रांत वारजूरकर व स्वर्गीय जिग्नेश धंधूकीया यांचा स्मृती निमित्त मागील १६ वर्षापासून येथील यूवक मंडळी पूढाकार घेत नविन वर्षाचे स्वागत सत्कार्याने व्हावे व नव्याने रूजू झालेली हूळदंगी परंपरेला आळा बसावा या उद्देशाने ३१ डिसेंबर रोजी मावळत्या वर्षाला रक्तदान सारख्या सामाजिक उपक्रमा द्वारे स्वागत करतात ही परंपरा यावर्षी सूद्धा कायम राहणार आहे.

यूवकानी या सत्कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन नगरसेवक सागर निरंकारी यानी केले आहे. अलीकडे मावळत्या वर्षाला निरोप देताना व नविन वर्षाचे स्वागत करताना नविन यूवकांची पीढी बेभान होत व्यसनाधिनतेचा कळस गाठत आहे नव्या पीढीत नको त्या व्यसनाचा शिरकाव थर्टी फर्स्ट निमित्त आयोजित होणार्या पार्टी मधूनच होतो, या रूजू झालेल्या वाईट परंपरेला फाटा देण्याकरीता मागील १६ वर्षापासून येथील काही सामाजिक कार्यकर्ते पूढाकार घेत यूवकाना वर्षाचा निरोप व नविन वर्षाचे स्वागत थर्टी फर्स्ट चा हूळदंग पणाने न करता रक्तदान करीत आपली सामाजिक जाबदारीचे भान ठेवण्याचे आवाहन करीत आहेत या उपक्रमाला मागील १६वर्षापासून बर्या पैकी प्रतिसाद सूद्धा मिळत आहे.

यावर्षी सूद्धा ३१ डिसेंबर बुधवार रोजी सकाळी ९ ते दूपारी १ वाज़े दरम्यान सिंधी भवन कूरखेडा येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबीरात मोठ्या संख्येत यूवकानी सहभागी होत आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी असे आवाहन नगरसेवक सागर निरंकारी, मधूकर वारजूरकर, यशपाल सहारे , सोनू रहांगडाले, विवेक निरंकारी, प्रवेश सहारे, मयूर सहारे, आशू बागडे, गोलू वैद्य, नौशाद सय्यद, पंकज टेंभूर्णे विनायक ठाकरे,यानी केली आहे.

### दर महिन्याला 3 जि.प. अधिकारी, कर्मचारी 'वॉल ऑफ फेम'वर

जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी एक अभिनव संकल्पना सुरू केली आहे.

# नितीन गडकरींचा पर्यायी इंधनावर भर

## 'दंडुका घेऊन बसलो आहे', युरो 6 नियमांचा दिला इशारा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पर्यायी इंधनाचा अवलंब करण्यावर भर दिला आहे. नागपुरातील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी वाहनचालकांना कठोर उत्सर्जन नियम लागू करण्याचा इशारा दिला. पर्यायी इंधनांचा वापर आता अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गडकरी म्हणाले, "मी वाहतूक मंत्री आहे, दंडुका घेऊन बसलो आहे." पर्यायी इंधनाचा वापर न केल्यास युरो ६ सारखे कठोर उत्सर्जन नियम लागू केले जातील, असा दम त्यांनी भरला. त्यांच्या या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. पर्यायी इंधनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार आर्थिक मदत करत आहे. ट्रॅक्टर कंपन्यांनी १००% इथेनॉल आणि सीएनजीवर चालणारे फ्लेक्स इंजिन ट्रॅक्टर विकसित केले आहेत. भविष्यात, बांधकाम उपकरणांना वित्तपुरवठा करणाऱ्या लोकांनी पर्यायी इंधन आणि जैवइंधन पर्याय निवडल्यास, त्यांना पाच टक्के अनुदान दिले जाईल. या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त प्रचार करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. अलीकडेच तीन ट्रक बाजारात आणले आहेत. यापैकी दोन ट्रकमध्ये डिझेल आणि पेट्रोल इंजिनमध्ये हायड्रोजन मिसळून वापरले जात आहे, तर एक ट्रक पूर्णपणे हायड्रोजन इंधनावर चालतो. बांधकाम आणि कृषी उपकरणांमध्येही असेच प्रयोग केले जात आहेत. देशाचे भविष्य पर्यायी इंधन आणि जैवइंधनाशी जोडलेले आहे. येणाऱ्या काळात भारताला प्रगतीपथावर नेणारा हाच मार्ग आहे, असेही गडकरींनी नमूद केले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या गायनाने गडचिरोलीकर मंत्रमुग्ध...! प्रशासकीय शिस्तीच्या गराड्यात 'गझल'चा सूर...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

### गडचिरोलीत घुमला जिल्हाधिकाऱ्यांच्या गझलचा सूर..! साहेबांच्या गायनानं लोक थक्क.!


■ गडचिरोली महोत्सवात जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी आपल्या सुमधुर आवाजात गझल सादर करून प्रशासकीय शिस्तीच्या गराड्यात दडलेली आपली कलासक्त बाजू दाखवत उपस्थित गडचिरोलीकरांना मंत्रमुग्ध केले.

गडचिरोली : जिल्हा पोलीस दलाच्या वतीने कृषीमहाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित गडचिरोली महोत्सवाने संपूर्ण जिल्ह्याला भुरळ घातली. विविध क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी असलेल्या या सोहळ्यात शनिवारी एक असा प्रसंग घडला, ज्याने उपस्थित प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. जिल्ह्याचे तरुण जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी चक्क माईक हातात घेत गझल गायन केले आणि उपस्थितांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला.

सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सत्रात जेव्हा जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा मंचावर आले, तेव्हा सर्वांना वाटले की ते केवळ शुभेच्छांचे दोन शब्द बोलतील. मात्र, त्यांनी जेव्हा आपल्या आवाजात गझल छेडली, तेव्हा संपूर्ण प्रांगणात शांतता पसरली. एखाद्या कसलेल्या व्यावसायिक गायकाप्रमाणे त्यांनी लावलेला सूर, शब्दांची फेक आणि गझलेतील नजाकत पाहून उपस्थित जनसमुदाय थक्क झाला. प्रशासकीय कामाचा ताण आणि शिस्तप्रिय अधिकारी अशी ओळख असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांचे हे कलासक्त रूप पाहून गडचिरोलीकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. 'जिल्हाधिकारी एवढ्या उत्तम रीतीने गाऊ शकतात, हे आमच्यासाठी अविश्वसनीय होते, अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया अनेक उपस्थितांनी यावेळी व्यक्त केली. त्यांच्या या सादरीकरणाने महोत्सवात एक वेगळीच रंगत आणली.

तत्पूर्वी याच सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आपली विशेष उपस्थिती लावली. राजकारणाच्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढत मुख्यमंत्र्यांनी या महोत्सवाचा निवांत आनंद लुटला. गडचिरोलीच्या मातीतील कला आणि संस्कृतीचा आविष्कार असलेल्या 'रेला' नृत्याची झलक पाहून त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद ओसंडून वाहत होता. मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रमात वारंवार टाळ्या वाजवून स्थानिक कलाकारांना आणि जिल्हा प्रशासनाच्या या उपक्रमाला मनापासून दाद दिली.

२६ तारखेपासून सुरू झालेल्या या महोत्सवात गडचिरोलीच्या दुर्गम भागातील कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचा पोलीस दलाचा हा प्रयत्न यशस्वी ठरला आहे. विविध क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमानंतर, २७ रोजी सकाळी आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'मॅरेथॉन'ने या महोत्सवाचा समारोप झाला. जिल्हाधिकाऱ्यांची गझल आणि मुख्यमंत्र्यांची उपस्थिती यामुळे हा 'गडचिरोली महोत्सव' जिल्ह्याच्या इतिहासात प्रदीर्घ काळ स्मरणात राहील, यात शंका नाही.











# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक
पेज डिझायनर.

- कोरल
- फोटोशॉप
- इनडिजाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सॲप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**